RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स
फिटर, पेंटर,
कारपेंटर,
प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर
वर संपर्क करावा.
संपर्क
मो. 8482839451



गुरूवार, ३ एप्रिल २०२५ | वर्ष : ५ | अंक : ९८ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Thursday, 3 April 2025 | Year : 5 | Issue : 98 | Daily | Rate: Rs. 5/-












## बुद्धगया मुक्तीसाठी नागपुरात ऐतिहासिक शांती मार्च

**नागपूर :** महाबोधी महाविहार मुक्तीकरीता गया येथे दिनांक 12 फेब्रुवारी 2025 पासुन आकाश लामा, आदरणिय भिख्खू संघ, समता सैनिक दल, दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया व अन्य बौद्ध संघटनांच्या माध्यमाने सुरु असलेल्या अनिच्छितकालिन भूख हडताल ला नागपुरवासियांचा पाठिंबा दर्शविण्याकरिता दिनांक 2 एप्रील 2025 ला दुपारी 4 : 00 वाजताच्या सुमारास दीक्षाभूमी ते संविधान चौक नागपूर दरम्यान आयोजित केलेल्या शांती मार्च ला नागपूर शहरातील विविध सामाजिक संस्था, संघटना व अंसख्य संविधान प्रेमी जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि या शांती मार्च ला यशस्वी केले. शांतीमार्च पूजनीय भिक्खू संघाच्या नेतृत्वात व समता सैनिक दलाच्या नियंत्रणात निघाला. शांती मार्च संविधान चौक येथे पोहचल्यानंतर मार्चचे समापनापूर्वी उपस्थित विशाल जनसभेला पूज्य भदंत प्रियदर्शी, भदंत नागदिपंकर, भदंत सीलवंस, भदंत नागसेन, भदंत डॉ. चंद्रकिर्ती, भदंत मेत्तानंद, भदंत हर्षदिप यांनी संबोधित केले. धम्म दूत भदंत संघरत्न मानके, भदंत धम्मशिखर, भदंत देवानंद आणि भिख्खूगण तसेच श्रामणेर वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यानंतर मुख्यमंत्री, बिहार राज्य, प्रधानमंत्री, केंद्र सरकार आणि राष्ट्रपती महोदय यांना जिल्हाधिकारी, नागपूर यांचे माध्यमाने निवेदने देऊन हा शांतीमार्च समापन करण्यात आला.

*शिष्टमंडळात प्रकाश दार्शनिक, सुरेश पाटील, अल्का चौकीकर, संजय फुलझेले, मनोज बनसोड, उमेश बोरकर, अजय सहारे, प्रा. राहुल मून, प्रसन्ना सहारे, अरूण गाडे, अशोक जांभूळकर, राजकुमार वंजारी उपस्थित होते.*

निवेदनाच्या माध्यमाने बिहार सरकारची बौद्ध गया टेंपल ॲक्ट 1949 चे माध्यमाने केल्या जाणारी कृती ही भारतीय संविधानाच्या कलम क्र. 13,14,15,25,26 चे उल्लंघन असून त्याचा निषेध करण्यात आला. शांती मार्च च्या माध्यमाने मुख्यमंत्री, बिहार राज्य, प्रधान मंत्री, केंद्र सरकार आणि राष्ट्रपती महोदय यांना दिलेल्या निवेदनात खालील प्रमुख मागण्यांचा समावेश होता. बौद्ध जनतेवर अन्याय करणाऱ्या बिहार सरकारच्या बौद्ध गया टेंपल ॲक्ट 1949 1949 ला त्वरीत रद्द करण्यात यावे. महाबोधी महाविहारचे संपूर्ण प्रबंधन हे केवळ बौद्धांच्या स्वाधीन करण्यात यावे आणि आंदोलनाला बसलेल्या भिख्खू आणि पदाधिकाऱ्यांवर गया प्रशासनाद्वारे केली जाणारी बळजबरी त्वरीत थांबवावी. शांती मार्च यशस्वी करण्यासाठी शंकरराव ढेंगरे, सारीपुत्र, विलास नितनवरे, सुनिल शेंडे, मनोहर गायकवाड, जयंत इंगळे, रणजीत रामटेके, उमेश बोरकर, राजेश ढंगरे, पृथ्वी मोटघरे, अमर दिपांकर, नरेश वाहाणे, भगवान गजभिये, संजय सोमकुवर, पुष्पा घोडके, छाया खोब्रागडे, वंदना लांजेवार, डॉ. मनोज मेश्राम, इंद्रपाल वाघमारे, अनिल मेश्राम, दिपक वासे, महेन्द्र भांगे, संपत वंजारी, पद्माकर गणवीर, चंदु कोचे, मिलिंद मेश्राम, दर्शन सहारे, विशाल कांबळे, अशोक कोल्हटकर, दिनेश अंडरसहारे, ईश्वर सुर्यवंशी, संजय आंभोरे तसेच विविध सामाजिक-धार्मिक संघटनेचे पदाधिकारी यांनी सहकार्य केले.

**क्षणचित्रे :**
* नागपुरातील 100 वर विविध संस्था संघटना सहभागी होऊन आपल्या संस्था संघटना यांचे कोणी ही बॅनर घेऊन आले नाही.
* चार चार रांगेने शांतीमार्च मध्ये स्त्री पुरुष चालत होते.
* समता सैनिक दल चे समता सैनिक यांनी विशेष परिश्रम घेतले
* कोणत्याही घोषणाबाजी न करता शांती मार्च दीक्षाभूमि वरून जनता चौक, पंचशील चौक, झाशी राणी चौक, महात्मा गांधी चौक, झिरो माईल, संविधान चौक. दुपारी 2 : 00 वाजता पासून दीक्षाभुमि लोक येणे सुरू झाले होते. काही मंडळी संविधान चौकात होती.
* नागपूर जिल्ह्यातील विविध तालुक्यातून लोक खाजगी बस करून आले होते. अत्यंत शांत पूर्ण वातावरणात शांतीमार्च निघाला




## नक्षलवाद्यांकडून सरकारपुढे युद्ध विराम प्रस्ताव

**गडचिरोली :** मागील दोन वर्षांपासून छत्तीसगड, महाराष्ट्रातील गडचिरोली, तेलंगणा, ओडिशा आणि झारखंड येथे नक्षलवादाविरोधात सुरु असलेल्या आक्रमक कारवायांमुळे घाबरलेल्या नक्षल्यांनी केंद्र सरकारपुढे युध्द विरामाचा प्रस्ताव ठेवला आहे. केंद्रीय समिती सदस्य अभय उर्फ सोनू भुपती याने यासंदर्भात माध्यमांना प्रसिद्धी पत्रक पाठवून कारवाया रोखण्याचे सरकारला आवाहन केले आहे. दोन दशकानंतर पहिल्यांदाच नक्षल्यांनी अशा प्रकारे शांतीप्रस्ताव पुढे केल्याने केंद्र सरकार काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



24 मार्च रोजी हैद्राबाद येथे एक गोलमेज बैठक घेण्यात आली होती. त्यात मध्य भारतात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये सुरु असलेला संघर्ष थांबवण्यात येऊन शांतीवार्ता केली पाहिजे, असे ठरविण्यात आले. गृहमंत्री अमित शहा यांनी मार्च 2026 पर्यंत देशातून नक्षलवाद हद्दपार करणार, अशी घोषणा केल्यानंतर छत्तीसगड, गडचिरोली, तेलंगणा, ओडीशा आणि झारखंड राज्यात नक्षलविरोधी अभियान अधिक गतिमान करण्यात आले आहे. यामुळे 15 महिन्यात झालेल्या चकमकीत तब्बल 400 हून अधिक नक्षलवादी ठार झाले. शेकडो कारागृहात आहेत. इतकेच नव्हे तर यात अनेक निरपराध आदिवासी मारल्या गेल्याचा दावाही पत्रकात केल्या गेला आहे.

## बाळासाहेबांचे विचार की राहुल गांधी?
## एकनाथ शिंदेंची टीका

**मुंबई :** संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजेजू यांनी वक्फ दुरूस्ती विधेयक सादर केले आहे. दरम्यान सध्या लोकसभा सभागृहात या विधेयकावर चर्चा सुरू असून, सत्ताधारी याचे समर्थन करत आहेत. तर, विरोधक याला विरोध करत आहेत. याचबरोबर या वक्फ दुरूस्ती विधेयकावरून सभागृहाबाहेरही प्रतिक्रिया उमटत आहेत. अशात आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वक्फ विधेयकावरील भूमिकेवरून उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेवर टीका केली आहे. मुस्लिम समाजाने विचार करावा



वक्फ दुरूस्ती विधेयकावर बोलतांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, 'हे विधेयक मुस्लिम समाजाच्या फायद्याचे आहे. त्याचा त्यांनी विचार केला पाहिजे.' पुढे पत्रकारांनी या विधेकावरील ठाकरे गटाच्या भूमिकेचा उल्लेख करतात एकनाथ शिंदे म्हणाले, 'हे बघा, असली पळपूटी भूमिका कशाला घ्यायची. स्पष्ट भूमिका घ्या ना. तुम्ही गोष्टी जेव्हा फायद्याच्या असतात तेव्हा धरता आणि तोट्याच्या असतील तेव्हा सोडता. लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयकावरील चर्चेदरम्यान काँग्रेस खासदार गौरव गोगोई यांच्यासह, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव, शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत आणि इतर वरोधी पक्षांच्या नेत्यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली आहे.

> " विधानसभा निवडणुकीत ते 100 जागा लढले आणि 20 जिंकले. इथून पुढे होणाऱ्या महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही जनता त्यांना जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही. आता बघायचे आहे की, ते बाळासाहेबांचे विचार आणि भूमिका घेऊन पुढे जातात की, राहुल गांधी सांगतील तसे करणार. आहे.
>
> **- एकनाथ शिंदे**

## देशात तीन राज्यांइतक्या वनजमिनीवर अतिक्रमण



**नागपूर :** देशभरातील सुमारे 13 हजार चौरस किलोमीटरपेक्षा अधिक वनक्षेत्रावर अतिक्रमण झाल्याची धक्कादायक बाब केंद्र सरकारच्या अहवालातून समोर आली आहे. दिल्ली, सिक्कीम आणि गोवा या तीन राज्यांच्या एकत्रित क्षेत्रफळापेक्षाही हे अतिक्रमण अधिक आहे. विशेष म्हणजे अद्याप 10 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी आपली आकडेवारी केंद्राला दिली नसल्याने अतिक्रमण यापेक्षा कितीतरी अधिक असण्याची शक्यता आहे. केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने राष्ट्रीय हरित लवादच्या निर्देशांनुसार आपल्या हद्दीतील वनजमिनींवरील अतिक्रमणांची माहिती सादर करण्याचे आदेश मे 2024मध्ये सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना दिले होते. 11 नोव्हेंबर रोजी बैठकही घेण्यात आली. आतापर्यंत 25 राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांनी माहिती सादर केली असून त्याआधारे मंत्रालयाने अहवाल तयार केला आहे. त्यानुसार 25 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मिळून सुमारे 13 हजार चौरस किलोमीटरहून अधिक वनक्षेत्र अतिक्रमणाखाली आहे.

## 112 वॅगन, 27 रेल्वे इंजिनची भंगारात विक्री

**अकोला :** भंगार व निरुपयोगी साहित्य विक्री करून रेल्वे प्रशासन मालामाल झाले आहे. या माध्यमातून रेल्वेच्या तिजोरीत मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त झाला. मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागात भंगार विक्रीतून प्राप्त होणाऱ्या महसुलात सर्वाधिक वाढ झाली. तब्बल 112.93 कोटी रुपये रेल्वेला भंगार विक्रीतून मिळाले आहेत. 112 वॅगन, 27 इलेक्ट्रिक रेल्वे इंजिन भंगारात विकण्यात आले आहे. याशिवाय विविध निरूपयोगी साहित्याची भंगारात विक्री केली.




भुसावल मंडळाने आर्थिक वर्ष 2024-25 साठी निश्चित केलेले भंगार विक्रीचे लक्ष्य पार करून एक महत्त्वपूर्ण उपलब्धी साधली आहे. विभागीय रेल्वे व्यवस्थापक इति पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली भुसावल मंडळाने 85 कोटी रुपये असलेल्या आंतरिक लक्ष्याला पूर्ण करून 112.93 कोटी रुपयांची भंगार विक्री केली. निश्चित उद्दिष्ट पेक्षा 32.87 अधिक महसूल भुसावळ विभागाने प्राप्त केला. ही विक्री मध्य रेलवेच्या कोणत्याही विभागाने या आर्थिक वर्षात साधलेली सर्वात मोठी भंगार विक्री आहे. यापूर्वी भुसावल मंडळांने आर्थिक वर्ष 2022-23 मध्ये 110 कोटी रुपयांची भंगार विक्री केली होती. 'पी-वे स्क्रॅप' 16 हजार 936 मेट्रिक टन विकले. लक्ष्यापेक्षा 169.36 अधिक विकण्यात आले. 112 वॅगन स्क्रॅपमध्ये विकल्या. उद्दिष्ट 75 वॅगनचे होते. त्यात 149.33 टक्के वाढ झाली. 'फेरस मेटल' चार हजार 246 मेट्रिक टन विक्री केली असून उद्दिष्टापेक्षा 212.32 टक्के जास्त आहे. इलेक्ट्रिक लोको 27 विक्री करण्यात आले.

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची चार पॅनलमध्ये लढत



**नागपूर :** वैद्यकीय व्यावसायिकांसाठी महत्वाच्या असलेल्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची (एमएमसी) निवडणूक 3 एप्रिल रोजी होणार आहे. निवडणुकीत नऊ जागांसाठी 41 उमेदवार मैदानात आहेत. प्रमुख लढत इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्रसह (आयएमए) एकूण चार पॅनलमध्ये असून काही स्वतंत्र उमेदवारही आहेत. निवडणुकीसाठी प्रत्येक जिल्ह्यात मतदान केंद्र राहणार आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या मागील दोन निवडणुकीत आयएमएचा वरचष्मा होता. यंदा आयएमएतर्फे नऊ जागांसाठी नऊ उमेदवार आहेत. त्यात नागपुरातील डॉ. संजय देशपांडे यांचा समावेश आहे. परिवर्तन पॅनलतर्फेही नऊ उमेदवार रिंगणात असून त्यात नागपुरातील डॉ. मंदार साने, डॉ. धीरज गुप्ता यांचा समावेश आहे. हिलिंग हॅन्ड्स युनिटी पॅनलचेही चार उमेदवार रिंगणात असून त्यात नागपूरकर असलेले माजी अधिष्ठाता डॉ. अरुण हुमणे यांचा समावेश आहे. विश्वास पॅनलतर्फे चार उमेदवार रिंगणात आहेत.

## महात्मा गांधींच्या पणती नीलमबेन यांचे निधन



**गुजरात :** महात्मा गांधींची पणती नीलमबेन पारिख यांचे गुजरातमधल्या नवसारी या ठिकाणी त्यांच्या निवासस्थानी निधन झाले आहे. नीलमबेन 92 वर्षांच्या होत्या. महात्मा गांधी आणि त्यांचा मोठा मुलगा हरिलाल यांच्यातल्या मतभेदांवर नीलमबेन पारिख यांनी एक पुस्तक लिहिले होते ज्यामुळे त्या चर्चेत आल्या होत्या. दक्षिणपथ आदिवासी महिलांच्या उद्धारासाठी नीलमबेन यांनी त्यांचे आयुष्य वेचले. या आदिवासी महिलांना स्वावलंबन शिकवणे, शिक्षण देणे आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम नीलमबेन यांनी केले.

## वक्फ दुरूस्ती विधेयकावरून काँग्रेसने सत्ताधाऱ्यांना घेरले




**नवी दिल्ली :** केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी संयुक्त संसदीय समितीने प्रस्तावित केलेले वक्फ (दुरूस्ती) विधेयक, 2025 लोकसभेत चर्चा आणि मंजूरीसाठी सादर केले. विधेयक सादर झाल्यानंतर, सभागृहात त्याच्या तरतुदी आणि परिणामांवर चर्चा सुरू झाली आहे. चर्चेदरम्यान, काँग्रेस नेते गौरव गोगोई यांनी भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला आणि त्यांनी विधेयकाच्या आडून जनतेची दिशाभूल केल्याचा आरोप केला. त्यांनी आरोप केला की सरकार 'फोडा आणि राज्य करा' या धोरणाला प्रोत्साहन देत आहे, ज्यामुळे समाजात आणखी फूट निर्माण होत आहे.

याचबरोबर गौरव गोगोई यांनी वक्फ कायद्यांमध्ये बदल करून सरकारला काय संदेश द्यायचा आहे? ज्या समुदायाने भारताच्या स्वातंर्त्य लढ्यात भाग घेतला त्या समुदायाला का सतत भ्रमीत करत आहात? असा सवाल केला. याचबरोबर गोगोई म्हणाले की, 'ज्या समुदायाने भारत छोडो आंदोलनात आपली साथ दिली त्या समुदायावर डाग लावायचा प्रयत्न करत आहात. ज्यांनी 1930 मध्ये दांडी मार्चला पाठिंबा दिला, त्यांच्यावर तुम्ही डाग लावण्याचा प्रयत्न करत आहात.

वक्फ विधेयक लोकसभेत सादर करण्यात आल्यानंतर, या विधेयकावर चर्चेसाठी 8 तासांचा वेळ देण्यात आला आहे परंतु सरकारने म्हटले आहे की जर सभागृह सहमत असेल तर चर्चेचा वेळ वाढवता येईल. सरकार आजच चर्चेला उत्तर देणार आहे.

**सत्ताधारी खासदारांना व्हीप**

तत्पूर्वी, सत्ताधारी पक्ष भाजपाने त्यांच्या सर्व खासदारांना आज सभागृहात उपस्थित राहण्यास सांगितले असून, त्यांना व्हीप जारी केला आहे. त्याचप्रमाणे टीडीपी, जेडीयू, आरएलडी यांनीही त्यांच्या खासदारांना व्हीप जारी केला आहे. दुसरीकडे, वक्फ विधेयकाला विरोध करण्यासाठी विरोधी पक्षही एकवटले असल्याचे पाहायला मिळत आहे.

> **जेव्हा तुम्ही इंग्रजांना माफीनामे...**
> दरम्यान गोगोई यांचे सभागृहातील हे भाषण सुरू असताना सत्ताधाऱ्यांनी गोंधळ सुरू केला. तेव्हा गोगोई सत्ताधाऱ्यांकडे बघत म्हणाले की, `जेव्हा तुम्ही तुम्ही भारत छोडो आंदोलनात सहभागी नव्हता तेव्हा त्यांनी भारत छोडोला पाठिंबा दिला होता. जेव्हा तुम्ही इंग्रजांना माफीनामे लिहित होता, तेव्हा या समुदायातील लोक शहिद होत होते.

## भारतीय संविधानाचा 75 वा वर्धापन दिन

### बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे जन्मशताब्दी वर्षे

**दैनिक बहुजन सौरभतर्फे बहिष्कृत भारत वर्तमानपत्राच्या वर्धापन दिनानिमित्त**

# संवाद मार्च

दि. 3 एप्रिल 2025. सकाळी 7.00 वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, वैशाली नगर ते जयभीम चौक यादवनगर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून जयभीम प्रवर्तक लोकप्रिय बाबू हरदास एल. एन. व बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या छायाचित्रांचे अनावरण. दैनिक बहुजन सौरभ हा घरोघरी लावला जावा हा संदेश या निमित्ताने देण्यात येईल. **विशेष सहकार्य :** हरदास नगर अर्बन क्रेडिट को ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, बाबु हरदास एल.एन. बहुउद्देशिय संस्था यादवनगर.

**विनित :** जयभीम चौक विकास समिती. सिनिअर सिटीजन. आटो संघटना. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान वैशाली नगर. दैनिक बहुजन सौरभ भागधारक व वाचक. समुह्घोष सामाजिक संस्था. उद्घोष मैत्री संघ.

“ आत्मविश्वास म्हणजेच यशस्वी जीवनाचा पाया. ”



*डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, ज्यांना आपण बाबासाहेब म्हणतो, हे भारतीय इतिहासातील एक महान विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी बुद्धिप्रामाण्यवाद (Rationalism) आणि विवेकवाद (Reasoning) यांना आपल्या जीवनाचा आधार बनवून सामाजिक सुधारणा, समता आणि अंधश्रद्धा निर्मूलनासाठी अथक कार्य केले. डॉ. बाबासाहेबांचा हा विचारप्रवाह भारतीय समाजाला अंधश्रद्धेच्या अंधारातून प्रकाशाकडे घेऊन गेला.*

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बुद्धिप्रामाण्यवाद, विवेकवाद



**बुद्धिप्रामाण्यवादाचा वैचारिक पाया :** डॉ. बाबासाहेबांचा बुद्धिप्रामाण्यवाद त्यांच्या शिक्षण आणि बौद्ध तत्त्वज्ञानाच्या अभ्यासातून घडला. कोलंबिया विद्यापीठातून अर्थशास्त्रात पीएच.डी. आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून कायद्याची पदवी घेताना त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन बळकट झाला. परंतु त्यांच्या बुद्धिप्रामाण्यवादाचा खरा स्रोत होता गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान. बुद्धांनी सांगितले की, 'प्रत्येक गोष्ट बुद्धीने तपासा, स्विकारण्यापूर्वी तर्काने परखून पाहा.' हेच तत्त्व डॉ. बाबासाहेबांनी आपल्या जीवनात आणि कार्यात उतरवले. त्यांचा ग्रंथ "The Buddha and His Dhamma" हा बुद्धि प्रामाण्यवादाचा उत्कृष्ट नमुना आहे, जिथे त्यांनी बौद्ध धम्माला आधुनिक काळाशी जोडताना अंधश्रद्धा आणि कर्मकांडांना पूर्णपणे नाकारले.

**विवेकवाद आणि सामाजिक क्रांती :** डॉ. बाबासाहेबांचा विवेकवाद त्यांच्या सामाजिक लढ्याचा पाया होता. त्यांनी जातीव्यवस्था, अस्पृश्यता आणि धार्मिक रूढींवर तर्काच्या आधारे प्रश्न उपस्थित केले. 'जातीचे उच्चाटन' (Annihilation of Caste) या भाषणात त्यांनी जातीव्यवस्थेचे तर्कशुद्ध विश्लेषण करून ती कशी अन्यायकारक आहे हे सिद्ध केले. महाडचा चवदार तळे सत्याग्रह (1927) आणि काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन (1930) यासारख्या घटनांद्वारे त्यांनी विवेकाच्या आधारे मानवी हक्कांचा पुरस्कार केला. त्यांचा असा विश्वास होता की, विवेकाशिवाय सामाजिक परिवर्तन अशक्य आहे.

**अंधश्रद्धा निर्मूलनासाठी योगदान :** डॉ. बाबासाहेबांचे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य हे त्यांच्या बुद्धिप्रामाण्यवादी विचारसरणीचा अविभाज्य भाग होते. त्यांनी भारतीय समाजातील खोलवर रुजलेल्या अंधश्रद्धा, कर्मकांड आणि पोंगापणा यांच्यावर थेट हल्ला चढवला. त्यांचे मत होते की, अंधश्रद्धा ही माणसाच्या बुद्धीला बेड्या घालणारी गुलामगिरी आहे आणि ती समाजाच्या प्रगतीतील सर्वात मोठा अडथळा आहे. त्यांनी लोकांना सांगितले, 'धर्माला अंधश्रद्धेचे गुलाम बनवू नका, तर बुद्धी आणि विवेकाच्या कसोटीवर तो तपासा.' 1956 मध्ये नागपूर येथे बौद्ध धम्माची दीक्षा घेताना त्यांनी 22 प्रतिज्ञा जाहीर केल्या, ज्यामध्ये अंधश्रद्धा आणि कर्मकांडांचा त्याग करण्याचा संकल्प होता. उदाहरणार्थ, त्यांनी प्रतिज्ञेत म्हटले, 'मी मूर्तिपूजा करणार नाही,' आणि 'मी अंधश्रद्धा आणि चमत्कारांवर विश्वास ठेवणार नाही.' या प्रतिज्ञांमधून त्यांचा अंधश्रद्धा निर्मूलनाचा दृढनिश्चय दिसून येतो. त्यांनी बौद्ध धम्म स्वीकारला. कारण तो कर्मकांड आणि अंधश्रद्धांपासून मुक्त होता आणि बुद्धीवर आधारित होता. डॉ. बाबासाहेबांनी अंधश्रद्धेच्या विरोधात केवळ सैद्धांतिक लढाईच लढली नाही, तर प्रत्यक्ष कृतीही केली. त्यांनी लोकांना जादूटोणा, भूतपिशाच्च आणि अवैज्ञानिक समजुतींपासून मुक्त होण्याचे आवाहन केले. त्यांचे लेख आणि भाषणे यातून त्यांनी समाजाला वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्यास प्रेरित केले. उदाहरणार्थ, त्यांनी हिंदू धर्मातील काही प्रथांवर टीका करताना म्हटले की, 'ज्या धर्मात तर्काला स्थान नाही, तो धर्म समाजाला पुढे नेऊ शकत नाही.'

**संविधानातील बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टिकोन :** भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेबांनी बुद्धिप्रामाण्यवाद आणि विवेकवादाला संविधानात स्थान दिले. मूलभूत हक्क, समता आणि धर्मनिरपेक्षता ही तत्त्वे त्यांच्या तर्कशुद्ध विचारांचा परिणाम आहेत. कलम 51-ए मध्ये नागरिकांचे कर्तव्य नमूद करताना वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावादाला प्रोत्साहन देण्याचा उल्लेख आहे, जो डॉ. बाबासाहेबांच्या अंधश्रद्धा निर्मूलनाच्या विचारांशी सुसंगत आहे. त्यांनी संविधान सभेत सांगितले, 'संविधान हे सामाजिक क्रांतीचे साधन आहे,' आणि या क्रांतीत अंधश्रद्धांचे निर्मूलन हे महत्त्वाचे पाऊल होते.

**शिक्षण आणि बुद्धीचा प्रसार :** डॉ. बाबासाहेबांना शिक्षण हे अंधश्रद्धा निर्मूलनाचे सर्वात प्रभावी साधन वाटत होते. त्यांनी 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा मंत्र दिला आणि पीपल्स एज्युकेशन सोसायटीद्वारे सिद्धार्थ कॉलेजसारख्या संस्था स्थापन केल्या. या संस्थांमधून तरुणांना तर्कशुद्ध आणि वैज्ञानिक शिक्षण देऊन त्यांची बुद्धी जागृत करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यांचे म्हणणे होते की, शिक्षणाशिवाय माणूस अंधश्रद्धेच्या बेडीतून मुक्त होऊ शकत नाही.

**डॉ. बाबासाहेबांचा वारसा :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बुद्धिप्रामाण्यवाद, विवेकवाद आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार आजही प्रासंगिक आहे. त्यांनी समाजाला प्रश्न विचारण्याची शक्ती दिली आणि अंधश्रद्धेच्या जोखडातून मुक्त होण्याचा मार्ग दाखवला. त्यांचे विचार आजच्या काळातही तरुणांना प्रेरणा देतात, विशेषतः जिथे माहितीचा पूर असला तरी विवेकाने ती तपासण्याची गरज आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बुद्धिप्रामाण्यवाद, विवेकवाद आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचे प्रतीक होते. त्यांनी आपल्या विचार आणि कृतीतून समाजाला तर्काच्या प्रकाशात आणले आणि अंधश्रद्धेच्या अंधारातून मुक्त केले. त्यांचा हा वारसा भारतीय समाजाला समता, स्वातंत्र्य आणि प्रगतीच्या मार्गावर चालण्यासाठी कायम प्रेरणा देत राहील. ■ ■

प्रवीण गांगुर्डे
मो. 9890631933

## प्रचारक

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

आज तो त्याच्या वडिलांना म्हणाला, 'बाबा! ज्यांच्यावर आपण जीव ओवाळतो. अशा व्यक्ती आपल्याबद्दल आपल्या पाठीमागे काय काय बोलतात. त्यांच्या या दुटप्पीपणाची खूप चिड येते.' त्यावर त्याचे वडिल म्हणाले, 'हे बघ! आपण स्वतः सचोटीने वागणारे असलो तर मग कुणी कितीही खोटे आरोप केले तर त्याची चिंता कधी करू नये, कधी कधी त्यांच्या कृतीवर कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त न करणे यासारखी दुसरी कोणतीही चांगली प्रतिक्रिया नाही. अशावेळी आपल्या रागावर नियंत्रण ठेवणे फार आवश्यक असते. कारण रागामुळे आपण कधीकधी स्वतःला सांभाळू शकत नाही; पण प्रेमाने आपण शत्रूलाही जिंकू शकतो. काही जण बरेचदा गैरसमजांमुळे आपल्याविरूद्ध बोलतात. अशा प्रसंगी आपली चूक नाही, हे माहीत असूनसुद्धा गप्प राहावे. योग्यवेळी त्याचा गैरसमज दूर करावा. तो जरी बोलतो तरी एकदा का त्याचे मन मोकळे झाले म्हणजे. त्याला पश्चाताप होतो. संबंध तोडायला काहीच वेळ लागत नाही. पण तडजोड करायला मात्र मनाचा मोठेपणा लागतो. पण काही व्यक्ती आपली चूक मान्य करत नाहीत. तेव्हा आपण संयम बाळगावा. ग्रहणाची झळ तर सूर्यचंद्रालाही सोसावी लागते. वाईट प्रवृत्तीची माणसे चिखलाच्या त्या वाटेसारखे असतात. ज्या वाटेवरून ना वेगाने पुढे जाता येते, ना थकलो म्हणून खाली बसता येते, म्हणून समजदार माणसे चिखल उडू नये म्हणून त्या वाटेवरून जाणे टाळतात. पण त्या चिखलाच्या वाटेला असे वाटते की, ही व्यक्ती आपल्याला घाबरते. एकदा का गरज संपली की, माणसे बदलतात. त्यांची बोलायची भाषा बदलते. ज्यांना इतरांची प्रगती बघवत नाही. चांगुले गुण दिसत नाहीत, ते लोक गावभर समोरच्याची बदनामी करत फिरतात. काही माणसे फक्त आपल्या समोर चांगले वागतात; पण पाठ फिरली की, यांच्या जिभा सैल सुटतात. यांचे दुःख एवढेच असते की, त्यांना इतरांचे सुख बघवत नाही. एकवेळ इतर कोणतीही गाठ सोडवता येईल; पण आतल्या गाठीच्या माणसांच्या बाबतीत ही बाब फार कठीण होत जाते. ज्यांना कधीकाळी आपण आपले समजायचो त्यांच्या करामती बघितल्यावर त्यांना आपले म्हणायची हिम्मत होत नाही. स्वार्थी व्यक्ती त्यांची गरज असेल तेव्हा जवळ येतात आणि सोईनुसार दूर जातात. नेमके आपले कोण आहेत याची परीक्षा संकटकाळात होते. कारण नसतांना गोड बोलणाऱ्या व्यक्ती या फार धोकादायक असतात. आयुष्यात जसे प्रशंसा करणारे हवे असतात, तसेच टिकाकारही पाहिजेत म्हणून टिकाकारांना खुशाल बोलू द्यावे. कारण ते आपले विनामूल्य प्रचारक असतात.' ■ ■

## शिक्षक सेवापूर्तीचा सोहळा



माझ्या माऊंट एव्हरेस्ट उच्च प्राथमिक शाळेचे संचालक आदरणीय श्रीरामजी बेहरे सर पंचमुर्ती शिक्षण संस्था सचिव. आदर्श शिक्षक राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त , आदरणीय सौ. ललिता बेहरे मॅडम माजी मुख्याध्यपिका संस्थाच्या उपाध्यक्षा, संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती प्रभाताई हरिरामजी बेहरे मॅडम, सहसचिव आदरणीय जयरामजी बेहरे सर, कार्याध्यक्षा सौ. सारिका ढोमणे मॅडम सदस्य अनिकेत बेहरे, मुख्याध्यापिका सौ. वंदना घारपुरे मॅडम, आमच्या पंडित नेहरू हायस्कुलचे मुख्याध्यापक माननीय प्रकाशजी भोयर सर, पर्यवेक्षक माननीय भागवतकर सर, माननीय बाळाभाऊ आगलावे सर, माननीय, राजेश शिंदे सर दोन्ही शाळेचे माझे सर्व सहकारी शिक्षक -शिक्षिका, शिक्षेकेत्तर कर्मचारी बंधू भगिनींनो आणि माझे आवडते सर्व विद्यार्थी मित्रानो आपण माझा दि. 29 मार्च 2025 ला अतिशय भाव विभोर होऊन हर्षउल्हासात सत्कार करून प्रेमाचा वर्षाव केला. त्या अविस्मरणीय क्षणाची आठवण सदैव माझ्या स्मरणात राहील. माझे कुटुंब, सर्व नातेवाईक, मित्रपरिवार, गुरुदेव सेवा मंडळ मित्र परिवार, कर्मयोगी फाउंडेशन मित्र परिवार, बहुजन सौरभ मित्र परिवार माझ्या या निवृत्ती सत्कार सोहळ्याला उपस्थित राहून, भरपूर प्रेम व स्नेहभेट दिल्यात त्या बद्दल व्यक्त होण्यास माझ्याकडे शब्द अपूरे आहेत. नभूतो न भविष्यती असा मंगलमय सोहळा आनंदाने दिनांक 31/03/2025 मंगळवारला रिजर्व्ह बँक स्टाफ कॉलनी गुलमोहर रविनगर इथे आदरणीय चंद्रभान राऊत दादा आयोजित गुरुदेव बाल मंडळ मंगलदीप नगर नागपूर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित सर्वधर्म सामुदायिक प्रार्थनेने निवृत्तीच्या कार्यक्रमाची सुरुवात करून राष्ट्रवंदनाने संपन्न झाला. माझ्या काही मित्र मैत्रिणींने मोबाईल, व्हाट्सअप, फेसबुकच्या समाज माद्यमातून शुभेच्छा दिल्यात मी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानते. आपल्या सर्वांचे सहकार्य व प्रेम मला सदैव मिळत राहिले. असेच प्रेम कायम असू द्यावे. धन्यवाद! ■ ■

- संकलन : लता देवीदास लाखे

# एवढी पैशाची उधळपट्टी कशाला ?

*बुद्धाचे तत्वज्ञान सांगते, 'प्रज्ञा-शिल-करूणा'. डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'शिका-संघटित व्हा-संघर्ष करा.' यापैकी आपण आंबेडकरवादी बौद्ध कोणते वचन पाळतो. पाळतो की पाळत नाही आणि जर मग आम्ही पाळत नसलो तर मग आम्ही कसले बौद्ध? किंवा कसले आंबेडकरवादी? आम्ही या वचनाचे कधीतरी पालन करतो का? याचा विचार प्रत्येक बुद्धिजीवी बौद्धाने व आंबेडकरवाद्याने विचार करणे गरजेचे नाही का?*



आज आपल्या समाजाची, धम्माची जी स्थिती आहे, त्याला जबाबदार कोण आहेत? आत्ता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाची जुळवाजुळव सुरू झाली. वस्त्यावस्त्यात, रस्त्यावर, बाजारात, जिकडे तिकडे वर्गणीचा सपाटा सुरू झाला. हे कश्याकरीता तर जयंतीदिनी बेसूर डी. जे. च्या तालावर वेडेवाकडे केस रंगवून मद्यधुंद आवस्थेत धांगड धिंगाना करून आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान करायला की अपमान? डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले वाचा. आम्ही वाचन सोडले आणि नाचने सुरु केले. नाचून कोणाचे भले झाले नाही. मित्रांनो चला आपण पुन्हा नाचण्याकडून वाचनाकडे वळूया. डी. जे. नावाच्या महा भयंकर रोगाला आळा घालूया. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या प्रज्ञासूर्यासोबत आपला वेडावाकडा चेहरा बॅनरवर छापण्याचा मोह टाळूया. विचार करा आपण दरवर्षी डीजे, बॅनर, भोजनदान, रॅली, सजावट, सामुहीक भोजन यावर किती खर्च करतोय. एवढी सारी रक्कम विधायक कार्यालय लावली तर..? हिशेब लावला, नागपूराचे सहा विभाग आहे पुर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण, दक्षिण-पश्चिम, मध्य. अंदाजे 600 लहान मोठे बुद्ध विहार आहेत. पैकी अंदाजे 450 विहारात जयंतीच्या उत्सवाकरीता बॅनर, लायटिंग, पताका, झेन्डे इ. खर्च सरासरी रू. 25000/-होत असल्यास

1) 450 विहार प्रत्येकी खर्च रू. 25000/- : एकूण रू 1,12,50,000/-

2) विहारा व्यतिरीक्त वस्तीतील जयंती मंडळे, वस्तीचे अंदाजे 200 गृहित धरले तर प्रत्येकांचा बॅनर, लायटिंग, पताका, साउन्ड, कार्यक्रम, भोजनदान, सामुहिक भोजन, यावर सरासरी रू 50,000/- होतो. म्हणजेच 200 वस्त्यात प्रत्येकी रू. 50000/- : 1,00,00,000/-

3) नागपूरातील असे काही चौक आहेत जिथे जयंतीचा केक, डिजे, एलएडी वॉल, लाखाच्या वर खर्च होते. असे अंदाजे 50 चौक आहेत. त्यावर प्रत्येकी रू 100000/-होते. म्हणजेच 50 चौकावरील एकूण खर्च 50,00,000/-अंदाजे. पुन्हा इतर खर्च आहेच.

अंदाजे होणारा खर्च 1,12,50,000+1,00,00,000 + 50,00,000 = 2,62,50,000/- या पेक्षा जास्त होत असते. एकंदरीत सारासार विचार केल्यास एकट्या नागपूर शहरात जयंती करीता होणारा खर्चाचा विचार केला तर, डिजे बॅनर, पत्रक, एलएडी वॉल, तोरण, नवीन कपडे, रोशनाई, भोजनदान आणि सामुहिक भोजन यावर होणारा खर्चाचा हिशेब केला तर दोन दिवसात चार ते पाच कोटी रूपये खर्ची होतात. ऐवढी पैशाची उधळपट्टी कश्या करीता? याचा विचार होणे गरजेचे नाही का? एका इंग्रजी वर्तमानपत्रात बातमी होती की कोरोना काळात भारतात आंबेडकर जयंती साजरी न केल्यामुळे बाजारपेठ व उद्योगात रू.1500 कोटीचा तोटा झालेला होता असा सर्वे रिपोर्ट आहे.

कोरोना काळात जयंती साजरी न केल्यामुळे डॉ. बाबासाहेब काही रूसले नाही. किंवा आपल्या मनातून डॉ. बाबासाहेबांची आस्था कमी झाली नाही. मग कश्याला हि उधळपट्टी? पण हे मनाला पटणार नाही हेही तेव्हढेच खरे आहे. इतर समाज करतो तर आपण का नाही करावे! मला वाटत हे एकाएकी कमी होणे असंभव जरी असले तरी अशक्य तर नाहीच. मग यावर उपाय काय आहे? त्याचे उत्तर आहे की उपाय आहे. तो असा की जर एखाद्या संस्थे, विहार, मंडळ, वस्त्या, यांनी ठरवले की जयंतीला गोळा होणारी वर्गणीमधून अर्धी रक्कम जयंतीच्या कार्याला खर्च करून उर्वरीत अर्धी रक्कम आपल्याच समाजाच्या बँकेत, सोसायटी, पतसंस्थेत आपल्याच विहार, मंडळ, वस्ती, संस्थेच्या नावे फिक्स जमा करून त्यावर येणाऱ्या व्याजावर आपल्याच समाजातील सुशिक्षीत बेरोजगार याला रोजगारांची संधी उपलब्ध करून दिल्यास समाजातील बेरोजगारी कमी होण्यास मदत होणार नाही का? किंवा हिच गोळा होणारी वर्गणी योग्य कामासाठी वापरली तर प्रत्येक वस्तीत एक विहाराजवळ एक सुसज्ज वाचनालय स्वबळावर उभी करू शकतो. मग कोणत्या राजकीय नेत्यापुढे भिक मागायची गरज पडणार नाही. कोणापुढे हात पसरण्याची गरज पडणार नाही. सर्व जयंती मंडळ विहार समित्याकडे वर्ग करून त्यांचे ऑडिट करावे. सर्व मंडळ, विहार, समित्याची एक सार्वजनिक पतसंस्थेत नेमून तिच्याकडे ठराविक निधी जमा करावा. प्रत्येक मंडळ, विहार, समितीने स्थानिक लेवलवर समाजातील बांधवांसाठी मोठे भव्य दिव्य नागपूरातील प्रत्येक विभागाच्या ठिकाणी मंगल कार्यालय उभारावे. विद्यार्थ्यांसाठी एक सुसज्य अभ्यासिका निर्माण करावी. शक्य झाल्यास समाजातील एखाद्या कुटुंबाकडे अतिरीक्त जमीन असल्यास त्यावर उद्योगाची निर्मिती करावी. ज्यात समाजातीलच गरजू सुशिक्षित बेरोजगार यांना कामाला लावता येईल. उद्योग असा निवडावा की ज्यात 200 ते 300 कामगारांना रोजगार मिळाले पाहिजे व हे सर्व जयंतीच्या गोळा होणाऱ्या पैशातून करावे.



नरेश साखरे
मो. 9923086515

मोठमोठे डिजे लावून आक्राळ-विक्राळ, किळसवाने नाचण्यापेक्षा, मिरवणुका, रैली काढुन अनावश्यक खर्च करण्यापेक्षा, भोजनदान, सामुहिक भोजन करण्यापेक्षा. समाजाच्या हितास्तव अश्या प्रकारचा प्रयत्न करणे शक्य नाही का? विचार करा. 'अन्नदानापेक्षा ज्ञानदान अति उत्तम असते.' दारू पिऊन, डिजे वर नाचण्यावरून दंगली घडतात. या गोष्टी समाजासाठी घातक आहेत. त्या ताबडतोब बंद केल्या पाहिजेत. शक्य असल्यास त्याची सुरवात करण्यास हरकत नसावी. सरतेशेवटी एवढीच विनंती आहे की या बाबीवर विचार होणे गरजेचे आहे व ते आपण सर्व जेष्ठ, बुद्धिजीवी, जागरूक नागरीक करू शकतो. ■ ■

# हरिश्चंद्र लाडे : वक्ता दशसहस्त्रेषु

> 'शतेषु जायते शूर :
> सहस्त्रेषुच पंडित ।
> वक्ता दशसहस्त्रेषु दाता
> भवति वा न वा।'
> *सदरहू संस्कृत सुभाषितानुसार शंभरामध्ये एखादा शूरवीर होऊ शकतो, हजारांमध्ये एखादा विद्वान होऊ शकतो, दहा हजारात कोणी एक एखादाच 'वक्ता' होऊ शकतो, तर दानदाता हा लाखांमध्ये एखादाच होऊ शकतो, असे म्हणतात ते काही खोटे नाही.*

वास्तविक पाहता उत्तम व यशस्वी वक्ता होण्यासाठी उत्तम भाषेचा सराव व निरंतर लेखन-वाचनाची सवय अंगी लावणे, हा छंद सातत्याने जोपासणे गरजेचे असते. कारण चांगला वक्ता होण्यासाठी चांगला श्रोता असावा लागतो आणि चांगला लेखक होण्यासाठी चांगला वाचक असावा लागतो. जो वक्ता आपल्या भाषणात श्रोत्यांची मने जिंकून त्यांच्यात स्वारस्य निर्माण करतो, तो वक्ता कृतिशील व वर्तनशील असतो, असे यशस्वी व नामवंत वक्त्यांनी आपल्या लेखन प्रपंचात नमूद केले आहे. नेमकी हीच कृतिशीलता व वर्तनशीलता हरिश्चंद्र लाडे सरांच्या वाणीतून, करणीतून, वर्तनातून, वक्तृत्वातून, लेखनातून, प्रबोधनातून, कवितेतून, निवेदनातून आणि सामाजिक जाणिवांमधून प्रकर्षाने जाणवते. अशा अष्टांग कौशल्यामुळे हरिश्चंद्र लाडे सर 'हजारों में एक' या लौकिकाचे व वक्तृत्वाचे मानकरी ठरतात, हे अधोरेखित करणे मला अगत्याचे वाटल्यावाचून राहविले नाही. कारण सरांनी बुद्ध, फुले, आंबेडकर यांच्यासारख्या अनेक संत-महापुरुषांनी अनेकानेक संदर्भातून केलेले कार्य वेगवेगळ्या विचारपीठांवरून अत्यंत तळमळीने व तेवढ्याच प्रखरतेने समाजापुढे एक 'आदर्श वक्ता' या भूमिकेतून हरिश्चंद्र लाडे सरांनी समाजमनांचे व विद्यार्थी मनांचे प्रबोधन केले.

गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी/मोर. तालुक्यातील प्रेक्षणीय व निसर्गरम्य नवेगावबांध या छोट्याशा गावी जन्मलेले हरिश्चंद्र लाडे हे भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील ग्रामीण भागातील पालांदूर/चौ. येथील सरस्वती विद्यालयात सहाय्यक शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी प्रामाणिकपणे अध्यापनाचे कार्य करून असंख्य विद्यार्थ्यांना घडविता घडविता संत महापुरुष, जगाच्या पाठीवर राज्य करणारे आदर्श विद्यार्थी, वैज्ञानिक, राष्ट्रसंत, यशस्वी व ऐतिहासिक महिला, आदर्श शिक्षक व आदर्श राजे यांनी मानवी कल्याणासाठी केलेले कार्य आपल्या उत्कृष्ट अध्यापनातून विद्यार्थ्यांच्या व समाज घटकांच्या मनामनात रुजविले. त्यामुळे सर हे विद्यार्थ्यांचेच नव्हे, तर समाजाचेही उत्कृष्ट प्रबोधनकार, उत्कृष्ट शिक्षक व पट्टीचे वक्ता ठरले. कारण सरांना सावित्रीने शिक्षण दिले, महात्मा फुलेंनी वैचारिक क्रांतीची मशाल दिली, बुद्धाने 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय'चा महामंत्र दिला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्ञानरूपी वाघिणीचे दूध दिले. ते संपूर्ण सरांनी प्राशन करून मोठ्यातल्या मोठ्या विचारपीठावरून महापुरुषांचे विचारधन, आपल्या प्रभावी वाणीने व वक्तृत्वाने भंडारा व गोंदिया जिल्ह्यात अनेक सभा व मंच जिंकण्याचा त्यांनी विक्रमच केला.

विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकवणारा 'हा' शिक्षक एकाचवेळी इंग्रजीसह मराठी भाषेचे ज्ञान देणारा द्विभाषिक शिक्षक व वक्ता म्हणून विद्यार्थ्यांच्या मनावर अधिराज्य करू लागला. इंग्रजी विषयाचे अध्यापन कार्य करणाऱ्या माणसाचे मराठी भाषेवर कमालीचे प्रभुत्व असून वाङ्मयीन ते सामान्यांच्या भाषेतूनही प्रबोधन करणारा हा आगळा-वेगळा 'कलावंत' त्यांच्या कार्यातून पाहायला मिळतो.

या कलावंताने केलेल्या कार्याचे व वक्तृत्वाचे काही नमुने उदाहरणादाखल प्रस्तुत करण्याचा प्रयत्न करीत आहे. गोंदिया जिल्ह्यातील आमगाव येथील महाप्रज्ञा बुद्ध विहार येथे भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दलाच्या वतीने दि.19 ऑक्टोबर 2022 ला धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी मी हरिश्चंद्र लाडे सरांना मुख्य वक्ता म्हणून आमंत्रित केले होते. त्या कार्यक्रमातून उत्कृष्ट वक्ता मला अनुभवता आला आणि या कार्यक्रमातूनच आम्हा दोघांची वैचारिक, सामाजिक व कौटुंबिक मैत्री निर्माण झाली. त्यांनी त्यावेळी केलेल्या भाषणातून त्यांच्या मनातील समाजाबद्दलची निष्ठा व जाणिवांची अनुभूती मला आली. सरांना विद्यार्थी दशेपासूनच समाजकार्याची आवड असल्याने नवेगावबांधच्या समता नवयुवक संघटनेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीचा वसा ते आजतागायत आपल्या गावात चालवित आहेत. सन 1988 पासून आजतागायत 'समाजाचे आपले काही देणे लागते,' याची जाण व भान ठेवून जगणारा शिक्षक हा केवळ शाळेतलाच नाही, तर समाजाचाही शिक्षक व मार्गदर्शक ठरला. यांच्या कार्याची नोंद अनेक संस्था, संघटना व समाजाने घेतली असून त्यांना अनेक शाळा, महाविद्यालय, संस्था व सामाजिक संघटनांनी त्यांच्या कार्याविषयी कृतज्ञ राहून त्यांना पुरस्कृत केले व त्यांचा सन्मान केला. तसेच दिनांक 1 जानेवारी 2009 ला लाखनी तालुक्यातील पालांदूर/चौर. येथे 'अखिल भारतीय आदिवासी हलबा महासंघ' या नामफलक अनावरण कायक्रमाप्रसंगी भारतीय संविधान हे बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारधारेवर आधारित असून या महामानवाचे विचार हलबा आदिवासी समाजाने स्वीकारल्याशिवाय या समाजाचा विकास होणे शक्य नाही, असे मत हरिश्चंद्र लाडे यांनी प्रमुख वक्ता म्हणून व्यक्त केले. दिनांक 13 सप्टेंबर 2014 ला स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय, लाखनी येथे आयोजित कार्यक्रमात हरिश्चंद्र लाडे सर यांनी स्वामी विवेकानंद युवकांचा वायु असून स्वामी विवेकानंदाचा वैज्ञानिक दृष्टिकोन युवकांनी बाळगण्याचे आवाहन यावेळी प्रमुख वक्ता म्हणून त्यांनी केले. दिनांक 12 जानेवारी 2016 ला पालांदूर /चौ. येथील त्रिरत्न बुद्ध



विहारात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणून स्त्री शिक्षणाचे महत्व यावेळी पटवून दिले. दि. 7 फेब्रुवारी 2017 रोजी लाखनी तालुक्यातील मुरमाडी /तुप. येथील भीम मेळाव्यात प्रमुख वक्ता म्हणून पंचशीलाचे मानवी जीवनात काय महत्त्व आहे हे सांगून आदर्श व्यक्ती बनण्याचे आवाहन सरांनी केले. दि. 7 फेब्रुवारी 2020 ला लाखांदूर येथे बहुजन प्रबोधन मंचाच्या वतीने आयोजित 16 व्या राष्ट्रीय संविधान साहित्य संमेलनानिमित्त कवी संमेलनात अध्यक्षीय स्थानावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जगण्यातून व प्रेरणेतून आंबेडकरवादी साहित्याची चळवळ उभी झाली व या चळवळीने कवितेतून समतेची, मानवमुक्तीची, विश्वबंधुत्वाची गाणी गायल्याचे सांगून हरिश्चंद्र लाडे या बहुगुणी कलावंताने विषमतेविरुद्धचा लढा उभारून समतेसाठी आपल्या लेखनी व वाणीच्या माध्यमातून परिवर्तनवादी महापुरुषांचे विचार आपल्या ओजस्वी वाणीने व वक्तृत्वाने समाजापुढे मांडले, हे विशेष. त्याही पुढे दि. 19 मार्च 2023 ला लाखांदूर येथे समता सैनिक दलाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात 'भीमसैनिकांचे कर्तव्य व कार्य' या विषयावर सरांनी अत्यंत प्रभावीपणे भीमसैनिकांना मार्गदर्शन केले. त्यानंतर दि. 14 एप्रिल 2023 ला अर्जुनी/मोर. येथे सम्राट अशोक, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती कार्यक्रमात महापुरुषांनी केलेल्या कष्टाची जाणीव ठेवून व त्यांचा आदर्श बाळगून स्वतःच्या विकासाबरोबरच समाजाचा विकास साधावा, असे आवाहन यावेळी सरांनी केले. तर दिनांक 28 एप्रिल 2023 ला लाखांदूर तालुक्यातील भागडी येथील बुद्धविहारात आयोजित श्रामणेर शिबिरात बुद्धाने दिलेल्या वैज्ञानिक धम्माचे आचरण व महत्त्व सांगून आपण बुद्धाचे तत्वज्ञान अंगिकारावे, असे आवाहन श्रामणेर विद्यार्थ्यांना सरांनी केले. दि. 2 एप्रिल 2024 ला नवेगावबांध येथे युवा फाउंडेशन तर्फे आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रमात भारताच्या पारतंत्र्यापासून ते संविधान निर्माण होईपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा देश एकसंघ राहावा, या देशात स्वातंत्र्य, बंधुता, न्याय व समता ही मानवी मूल्ये रुजावीत या उदात्त हेतूने डॉ. बाबासाहेब अखेरच्या श्वासापर्यंत जगत राहिले. त्यामुळे हा भारत देश प्रगतीपथावर गेला. कारण या देशाच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेबांचा सिंहाचा वाटा आहे, असे मत हरिश्चंद्र लाडे सरांनी व्यक्त केले. तर नवेगावबांध लगत असलेल्या मांगली येथे आयोजित अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रमात अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे तालुकाध्यक्ष या नात्याने, हरिश्चंद्र लाडे यांनी वैज्ञानिक युगात वावरत असताना अंधश्रद्धेत जगणे म्हणजे मानसिक गुलामगिरी असल्याचे सांगून यातून बाहेर निघण्याचा उत्तम मार्ग म्हणजे प्रत्येकांनी वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून जीवन जगावे, असे यावेळी त्यांनी सांगितले. तसेच 23 फेब्रुवारी 2023 ला पालांदूर येथील श्री संताजी कला व विज्ञान महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात हरिश्चंद्र लाडे सरांनी विद्यार्थ्यांना भाषेचे महत्त्व पटवून दिले. तर सरस्वती विद्यालय पालांदूर/चौ.येथे आयोजित डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणादिन कार्यक्रमाप्रसंगी सरांनी, विद्यार्थ्यांच्या वाचनाच्या कक्षा रुंदावल्या पाहिजे, असे सांगून 'आपण त्यांच्या समान व्हावे!' असे आवाहन दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन शिबिरात केले. तसेच जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालय पालांदूर/चौ. येथील कार्यक्रमात 'विद्यार्थ्यांचे दीपस्तंभ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर प्रमुख वक्त्याच्या भूमिकेतून महापुरुषांचा आदर्श विद्यार्थ्यांनी बाळगून जीवनात यशस्वी व्हावे, असे आवाहन हरिश्चंद्र लाडे सरांनी केले. तर भंडारा येथील इंटरनॅशनल स्कूल येथे स्नेहसंमेलनाप्रसंगी सरांनी मुख्य वक्ता म्हणून आव्हाने स्वीकारणारी माणसेच जीवनात मोठी होऊ शकतात, मात्र ही आव्हाने स्वीकारण्याचे सामर्थ्य निर्माण करणारे प्रभावी केंद्र शाळा-महाविद्यालये हेच आहेत, असे त्यांनी सांगितले.

अशाप्रकारे याहूनही अनेक कार्यक्रमांच्या माध्यमातून हरिश्चंद्र लाडे सर वक्त्याच्या भूमिकेतून समाज, विद्यार्थी, युवक, महिला, वंचित यांच्यात आपल्या प्रभावी वक्तृत्व शैलीने जाणीव जागृती करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत असल्याचे वरील आलेखावरून दिसून येते. मात्र वक्ता कसा असावा? तर हरिश्चंद्र लाडे सरांसारखा असावा, असे संबोधने मला औचित्याचे वाटते, यात तिळमात्र शंका नाही. मात्र अनेक वक्ते घनाघाती, तडाखेबाज भाषणातून सभा गाजवू शकतात, वाहवा मिळवू शकतात, परंतु लोकांची मने जिंकायला व जनप्रबोधन करायला त्या वक्त्यामध्ये असलेली समाजाबद्दल तळमळ, कळकळ, जिव्हाळा, त्याग व कष्टाचे प्रतिबिंब त्यांच्यात अनुभवता आले पाहिजे. मात्र नेमकी हीच अनुभूती सरांच्या वक्तृत्वातून त्यांच्या कृतिशीलतेचा परिचय श्रोत्यांना करून देत असते. वास्तविक पाहता वक्तृत्व हा अणकुचीदार विषय असला तरी, श्रोत्यांना विचार करायला भाग पाडणारा आहे. हा विषय तसा चिंतनीय आहे. लोकांच्या मनावर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा व विचारांचा प्रभाव श्रोत्यांवर पाडणे आवश्यक आहे. कारण अलंकारिक भाषा, वजनदार शब्द आणि पुस्तकी ज्ञान असणाऱ्या वक्त्याचे भाषण लोक ऐकून घेतात, पण कृती मात्र अजिबात करीत नाहीत. फक्त शब्दांचा अवडंबर उभा करणाऱ्या वक्त्याविषयी लोक बोलताना म्हणतात की, तो बोलणारच, त्याचे बोलण्याचेच काम आहे, आपण त्याचे मनावर घ्यायचे असते का? असे बोलून लोक मोकळे होतात.

त्या वक्त्याचे विचार तिथेच सोडून जातात. असे असले तरी, सर्वच श्रोते तसे नसतात. ज्ञानप्रिय व सामाजिक जाणिवा असलेला श्रोता त्या वक्त्याला स्वीकारतो व त्या वक्त्याचे विचार आपल्या वर्तनात परिवर्तित करून ते आचरणात आणण्याचा सकारात्मक दृष्टीने विचार करतो. हेच त्या वक्त्याचे खरे फलित असते. अशा ज्ञानप्रिय व सामाजिक जाणिवा असलेल्या श्रोत्यांनी सरांना मनस्वी स्वीकारले. कारण हरिश्चंद्र लाडे सर हे कृतिशील वक्ता असल्यामुळे व समाजाबद्दल त्यांच्या मनात तळमळ व जिव्हाळा असल्यामुळे त्यांच्या कृतिशील बोलण्याचा जनमानसावर ठसा उमटताना दिसून येतो. कारण 'हरिश्चंद्र' नावाच्या माणसाने आदर्श शिक्षक, उत्कृष्ट वक्ता, लेखक, गायक, कवी, प्रबोधनकार, निवेदक, साहित्यिक, विचारवंत, चिंतक, सामाजिक कार्यकर्ता, दिशादर्शक, वाचक, श्रोता व अभ्यासक अशा अनेक भूमिकांतून सरांनी सामाजिक, शैक्षणिक, वैचारिक, धार्मिक, तात्विक, सांस्कृतिक कार्याचा वसा जपून समाजाला, महिलांना, तरुणांना आणि विद्यार्थ्यांना जीवनाचे 'सामर्थ्य व अर्थ' अत्यंत ममत्वाने सांगितले आणि तितक्याच पोटतिडकीने व प्रभावीपणे श्रोत्यांच्या, रसिकांच्या, वाचकांच्या, प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य करून हा हरिश्चंद्र केवळ 'वक्तृत्व सम्राट'च ठरला नाही, तर तो 'वक्ता दशसहस्त्रेषु' ठरला. ■ ■

डॉ. प्राचार्य धर्मरक्षित टेंभुर्णे
नागपूर

# भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारकाच्या विकास कामाला सुरुवात करणार : अण्णा बनसोडे

**कोरेगाव भीमा :** ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजयस्तंभ हे शौर्याचे प्रतीक असून 01 जानेवारी रोजी विजयस्तंभ स्मारकास अभिवादन करण्यासाठी लाखो भीमसैनिक अनुयायी येत असतात. महाराष्ट्र शासनाच्यावतीने भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारकाच्या विकास कामास लवकरच सुरू करण्यात येणार असून सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी अर्थसंकल्पात 100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यापेक्षाही जास्तीचा निधी शासनाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती विधानसभेचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष आमदार अण्णा बनसोडे यांनी विजयस्तंभ येथे पत्रकारांशी बोलताना दिली.



विधानसभेच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर आमदार अण्णा बनसोडे यांनी दिनांक 31 मार्च 2025 रोजी ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारकास भेट देऊन पुष्पचक्र अर्पण करून विनम्र अभिवादन केले. तसेच त्यांनी छत्रपती संभाजी महाराज यांचे समाधी स्थळ असलेल्या तुळापूर, वढु बुदृक येथील तसेच शूरयोद्धा गोविंद गोपाळ गायकवाड समाधीस्थळी भेट देऊन विनम्र अभिवादन केले. विजयस्तंभ येथे बार्टी संस्थेच्या वतीने त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा, विजयस्तंभाची प्रतिकृती व भारताचे संविधान हे अ‍ॅड. गौरक्ष लोखंडे, सुमेध थोरात, रामदास लोखंडे यांच्या हस्ते भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

रामदास लोखंडे यांनी भीमा कोरेगाव विजयस्तंभ जागेबाबत उच्च न्यायालयात सुरु असलेल्या न्यायप्रविष्ठ प्रकरणाची माहिती देऊन बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांनी भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारकाचा विकास आराखडा शासनास सादर केला असल्याचे सांगितले.

याप्रसंगी अनुसूचित जाती व जमाती आयोगाचे सदस्य अ‍ॅड. गौरक्ष लोखंडे, बार्टीचे प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात, राहुल कवडे, पेरणेच्या सरपंच उषा दशरथ वाळ्के, कोरेगाव भीमाचे सरपंच संदिप ढेंरगे, विस्तार अधिकारी मोरे, मंडल अधिकारी संदिप झिंगाडे, ग्रामपंचायत सदस्य सुनिल आवचर, साईनाथ वाळ्के, राजाभाऊ गवदे, भारतीय बौद्ध महासभेचे कोमल वासनिक, सुधाकर लोखंडे, ग्रामविकास अधिकारी रतण दवणे, किसन बिबे, शांताराम पाडळे, सदानंद फडतरे यांच्यासह भीमा कोरेगाव परिसरातील नागरिक आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लुंबिनी गोल्डन पॅगोडा ट्रस्टतर्फे निसर्गरम्य वातावरणातील धम्मदीप विपश्यना केंद्राचे उद्घाटन



**अकोला :** लुंबिनी गोल्डन पॅगोडा मल्टिपल चॅरिटेबल ट्रस्ट चिंचोली रुद्रायणी यांच्या वतीने यांच्या अधिनस्त धम्मदीप विपश्यना केंद्राचा ऐतिहासिक व अविस्मरणीय उद्घाटन सोहळा चिंचोली रुद्रायणी तालुका बार्शीटाकळी जिल्हा अकोला येथे निसर्गरम्य अशा परिसरात झाला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी महाथेरो विनय बोधी बर्गिन हम युनिव्हर्सिटी युके अध्यक्ष, भन्ते फाम फु ताह व्हिऐतनाम, भिक्खू ग्यानरक्षित थेरो, औरंगाबाद, भंते धम्मानंद पुणे, भंते संघदूत अरुणाचल प्रदेश, नागूयेन थी किम व्हिऐतनाम, कमल गवई वरिष्ठ विपश्यना आचार्य अमरावती, विनय दाहट वरिष्ठ विपश्यना विभागीय क्षेत्रीय नागपूर यांच्यासह राज्यातील प्रशासनातील विविध विभागातील तसेच मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी, आदी उपस्थित होते. यावेळी लुंबिनी गोल्डन पॅगोडा मल्टिपल चॅरिटेबल ट्रस्टचे प्रमुख बाळासाहेब वानखेडे यांनी, हे महाराष्ट्रातील तिसरे ऐतिहासिक अविस्मरणीय भव्य दिव्य निसर्गरम्य वातावरणातील विपश्यना केंद्र आहे या विपश्यना केंद्राचा भारतातील विपश्यना प्रेमींनी असेच अनुयायांनी लाभ मोठ्या संख्येने घेण्याचे आवाहन केले. तसेच मंत्रालय अधिकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष तथा मंत्रालयातील अधिकारी भारत वानखेडे म्हणाले की, आजच्या या धकाधकीच्या काळात अधिकारी, कर्मचारी शासकीय काम करताना प्रचंड ताणतणावात जीवन जगत आहेत या ताणतणावाच्या मुक्तीसाठी अधिकारी कर्मचाऱ्यांनी दररोज विपश्यना ध्यानधारणा करणे आवश्यक असल्याचे म्हटले. या उद्घाटन सोहळ्याच्या ऐतिहासिक कार्यक्रमाला 5000 पेक्षा जास्त विपश्यना प्रेमींनी उपस्थिती दर्शविली होती हे विशेष.




**महाप्रज्ञा बौद्ध विहार मार्ग क्रमांक - 8 जोगीनगर**

नागपूर - 27, बौद्ध संस्कृती केन्द्र, फुले, शाहू, आंबेडकर विचार प्रचार, प्रसार नियमित वंदना विविध कार्यक्रमांचे आयोजन. प्रत्येक रविवारला सकाळी 8:00 वाजता धम्म वर्ग होतात. सुधीर वानखेडे, मो.9421778895, मार्गदर्शन करतात. महिला मंडळ द्वारा व्यवस्थापन शिला शेन्दरे - 9325081027, उमा शंभरकर (9371236232) सरीता मंडपे, असजीत वैरागडे, स्वप्नील करुनाकर, ललिता मंगेशकर, माधुरी पाटील,

संवाद मित्र, डी. आर. कांबळे
मो.8600924170

## सार्वजनिक सुरक्षा विधेयकासंदर्भात गोंडवाना गणतंत्र पार्टीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**नागपूर :** महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक 2024 च्या संदर्भात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच महाराष्ट्र विधानसभाचे सचिव जितेंद्र भोळे यांनाही निवेदन दिले. गोंडवाना गणतंत्र पार्टीच्यावतीने कार्यालयात सभासदांची संक्षिप्त मते सूचना व आक्षेप इत्यादी बाबींवर चर्चा करण्यात आली. चर्चा केल्यानंतर निवेदन सादर करण्यात आले. महाराष्ट्रात विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक मुळातच असविधानिक अतिविस्तृत अनियंत्रित असून त्याचा गैरवापर होण्याची शक्यता जास्त आहे. या विधेयकामुळे संविधानाची पायमल्ली होत आहे. असे सुद्धा निवेदनात म्हटले गेले. गोंडवाना गणतंत्र पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष हरीश उईके यांनी महाराष्ट्र राज्य या विधेयकाला विरोध केला असून विधेयक स्पष्टपणे नाकारावे आणि महाराष्ट्र राज्याच्या लोकशाही मूल्य आणि संविधानाच्या मूलभूत अधिकार यांचे जतन केले जावेत. अशी मागणी सुद्धा या निवेदनात केली गेली. याप्रसंगी प्रदेश अध्यक्ष हरीश उईके, प्रदेश महासचिव सुधाकर आत्राम, महेश बम्हनोटे, सुधाकर परतेकी, दिनेश सिडाम, प्रवीण मडावी यांची उपस्थिती होती.

## महत्वाचे

### धम्मसंगोष्टीत आज बहिष्कृत भारत वर्धापन दिन

**नागपूर :** दिनांक 3 एप्रिल 2025 रोजी सकाळी 9 वाजता नरेश धोपटे यांचे निवासस्थानी जयदुर्गा सोसायटी नंबर 2 येथे धम्म संगोष्टीची 336 वी सभा आयोजित केली आहे. सामाजिक कार्यकर्ते एस.टी. चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख वक्ते समता सैनिक दलाचे प्रमुख प्रदीप गायकवाड 'अनुसूचित जातींचा बजेटमध्ये वाटा आणि त्याकरिता कायदा' या विषयावर आपले विचार व्यक्त करतील. 3 एप्रिल 1927 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत भारत या वृत्तपत्राची निर्मिती केली होती. ही ऐतिहासिकता लक्षात घेऊन प्रा. घनश्याम धाबर्डे आपल्या प्रास्ताविकात बहिष्कृत भारत या वृत्तपत्राच्या निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका स्पष्ट करतील. या सभेला जास्तीतजास्त संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे. असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

### आदिवासींसाठी ठक्करबाप्पा योजना




**वर्धा :** आदिवासी बहूल गावांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासोबतच त्यांच्या गावाचा विकास करण्यासाठी शासनाने ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना अंमलात आणली आहे. या योजेनेतंर्गत विविध जिल्ह्यातील आदिवासी बहूल गावांच्या विकासासाठी योजना येणार.पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी घेतला पुढाकार.14 कोटी 59 लक्ष 69 हजार रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. राज्यातील आदिवासी समाज हा जंगल व्याप्त व दुर्गम भागात वास्तव्यास असल्याने या भागाचा विकास पाहिजे त्या प्रमाणात झाला नव्हता. आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दलित वस्ती कार्यक्रमाच्या धर्तीवर राज्य शासनाने आदिवासी बहुल गावांचा विकास करण्यासाठी ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला.

### विद्यार्थ्यांना शाळेत सोडतांना त्यांचे वेदनांनी विव्हळणारे चेहरे मला छळतात : एका ऑटोचालक

**नागपूर :** भालदारपुरा, इतवारी, गंजीपेठ, मोमीनपुरा हा भाग म्हणजे माझी कर्मभूमी येथील सामाजिक सौहार्द हा माझ्यासाठी तसा अभिमानाचा विषय जाती-पातीवरून भांडणाऱ्यांना मी अनेकदा याच माझ्या कर्मभूमीचे उदाहरण द्यायचो पण, दंगलीनंतर माझे शब्दच मौन झालेत या भागात झालेल्या दंगलीने सामाजिक सौहार्दाचे समीकरणच बदलून टाकले आहे. माझ्या ऑटोरिक्षातील दोन विद्यार्थ्यांच्या नातेवाईकांना पोलिसांनी दंगलीशी संबंध नसतानाही कारागृहात टाकले. त्यापैकी एक मुलगा यंदा दहावीची परीक्षा देत आहे. आजही या विद्यार्थ्यांना शाळेत सोडताना त्यांचे वेदनांनी विव्हळणारे चेहरे मला छळतात. अशा शब्दात बहुसंख्य समाजातील एका ऑटोचालकाने दंगलीचे दुःख विशद केले.

## 5 एप्रिलला बसपातर्फे सम्राट अशोक जयंती




**नागपूर :** प्रियदर्शि चक्रवर्ती सम्राट अशोक मौर्य यांची 5 एप्रिल (अशोकाष्टमी) रोजी 2329 वी जयंती आहे. कही हम भूल ना जाये या बसपाच्या राष्ट्रीय अभियानांतर्गत सकाळी 10 वाजता दीक्षाभूमी येथे असलेल्या सम्राट अशोक यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात येईल. सम्राट अशोक हे तथागत बुद्धाच्या विचाराने प्रेरित झालेले प्रथम महान सम्राट होय. त्यांनी तथागतांच्या स्मृती प्रित्यर्थ देशभर 84 हजार विहार व स्तुपांची निर्मिती केली होती. मानवतावादी, करुणामयी राजाने पशुपक्षासाठी सुद्धा पाण्याची व्यवस्था केली होती. त्यांनी आपल्या कारकिर्दीत केलेल्या कार्याचा उल्लेख जुनागड, शाहबाजगढी आदि ठिकाणावरील शिलालेखाद्वारे आजही मिळतो. त्यांचे युग सुवर्णयुग म्हणून ओळखले जाते. त्यांच्या कालकर्तृत्वाला उजाळा देण्यासाठी बहुजन समाज पार्टीने त्यांच्या जयंती समारोहाचे आयोजन केले आहे. बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर, कांशीराम यांच्या चळवळीत कार्य करणाऱ्या पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतकांनी आपल्या प्रियदर्शी सम्राट अशोकाला अभिवादन करण्यासाठी शनिवार 5 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजता दीक्षाभूमी परिसरात एकत्र यावे. असे आवाहन उत्तम शेवडे यांनी केले आहे.

## दिव्यांग तिरंदाज इस्थर कुजुर हिचे पॅरा ऑलिम्पिक ट्रायलसाठी जाण्याचे स्वप्न पूर्ण

### कर्मश्री दुर्गादास रक्षक स्मृति प्रतिष्ठानने घेतली दखल



**नागपूर :** उपराजधानीत असंख्य गुणवाण खेळाडू आहेत. मात्र कधी आर्थिक परिस्थीती अथवा पायाभूत सुविधांच्या अभावी ते ध्येय गाठू शकत नाही. फुटबॉल, हॉकी, बुद्धीबळ तब्बल पाच खेळामध्ये आपले कर्तृत्व सिद्ध करणारी इस्थर कुजुर हिला नोव्हेंबर 2020 एका अपघातात तिला स्वतःचा पाय गामवावा लागला. अपघात बिकट होता, वडील सोबत होते. ती नेह्मीसाठी एका पायाने दिव्यांग झाली. मैदानावर सुसाट वेगाने धावणारी इस्थर आर्टीफीशल पायाने ती पुन्हा मैदानात उतरली. ती आता तिरंदाज खेळात स्वतःला सिद्ध करण्यासाठी पॅरा ऑलिम्पिकच्या ट्रायलसाठी जात आहे. झोपडपट्टीत राहणारी इस्थर आर्थिकतेने कमजोर तरी उच्चशिक्षीत पण खेळावर नितांत प्रेम. त्यावर तिचे संशोधनात्मक प्रबंधाचे काम सुरू आहे. इस्थर हिची व्यथा प्रसिद्धी माध्यमांनी मांडल्या. फक्त अभिनंदनाचे फोन आल्याचे कर्मश्री दुर्गादास रक्षक स्मृती प्रतिष्ठानचे विश्वस्थ ज्ञानेश्वर रक्षक आणि बालसदनचे विश्वस्थ प्रशांत हाडके यांना कळले. आर्थिक नियोजनाचे काय ? ज्ञानेश्वर रक्षक आणि प्रशांत हाडके यांच्या पुढाकाराने 25,000 हजार रूपये आर्थिक मदत अनंता रक्षक यांचेकडून एका छोटेखानी कार्यक्रमात करण्यात आली. नागपूरच्या अप्पर आयुक्त आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे यांच्या हस्ते ही आर्थिक मदत इस्थरला दिली. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची प्रतिमा भेट देऊन तिचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी ज्ञानेश्वर रक्षक, प्रशांत हाडके, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजू हिवसे, डी. डी. गोंडाणे यांची उपस्थिती होती. याचवेळी भारतीय सैन्यातील माजी सैनीक देवीदास लाखे यांनी पण इस्थर हिला आर्थिक मदत दिली. सर्वांनी तिच्या ध्येयाला सलाम करीत भारताचे नाव खेळामध्ये उज्वल करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## बार्टी तर्फे ओबीसी प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रलंबित वैधता प्रमाणपत्राबाबत आवाहन



**पुणे :** शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रलंबित वैधता प्रमाणपत्राबाबत पार्टीतर्फे आवाहन केले आहे. शैक्षणिक वर्ष 2024 -25 करीता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातून प्रवेशित झालेल्या व समितीकडे अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांना आजतागायत जात वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशा उमेदवारांची अभ्यासक्रमनिहाय, जिल्हानिहाय व प्रवर्गनिहाय ष्टश्वञ्ज ष्टश्वरू कडून यादी प्राप्त झाली आहे. सदर यादी सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना पाठविण्यात आली आहे. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातून प्रवेशित झालेल्या उमेदवारासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करावयाचा अंतिम दि. 06/04/2025 असे कळविले आहे.

त्या अनुषंगाने सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडे प्रलंबित अर्जांवर विद्यार्थ्यांना त्रुटी पूर्तता करण्याबाबत स्स्र्/ श्वद्वड्डद्बद्य/ पत्राव्दारे संबंधित समित्यांमार्फत कळविण्यात येऊनही अनेक अर्जदार/विद्यार्थी व पालकांनी संबंधीत समित्यांशी संपर्क साधलेला दिसून येत नाही. महाराष्ट्र अनु. जाती, अनु. जमाती, विजाभज, इमाव व विमाप्र (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम 2000 (2001 चा महाराष्ट्र क्र.23) व त्या अंतर्गत नियम 2012 अन्वये, सदर अर्जावरील त्रुटी पूर्तता करण्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी अर्जदारांची आहे. तरी संबंधीत अर्जदार/पालक यांनी त्रुटींची पूर्तता करण्यासाठी व्यक्तीशः संबंधीत समितीशी त्वरीत संपर्क साधावा.

एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातून प्रवेश घेतलेले उमेदवार व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळणेपासून वंचित राहू नये याकरिता ज्या अर्जदार/विद्यार्थ्यांनी अद्यापही अर्जाच्या अनुषंगाने त्रुटींची पूर्तता केलेली नाही, त्यांनी संबंधीत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीशी त्वरीत संपर्क साधावा व त्रुटींची पूर्तता करावी जेणेकरुन समितीला विहित वेळेत निर्णय घेता येईल असे आवाहन संजय शिरसाट, मंत्री सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई व डॉ. हर्षदीप कांबळे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई असे जाहीर आव्हान बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

### महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आयोजित पुणे येथे विवेकरेषा व्यंगचित्र प्रदर्शन

## विवेकवादी विचारांचे महाराष्ट्रातील पहिलेच व्यंगचित्र प्रदर्शन

> या व्यंगचित्र प्रदर्शनामध्ये देशभरातील प्रसिद्ध व्यंगचित्रकारांची चित्रे आहेत. त्यामध्ये सतीश आचार्य (कर्नाटक), मंजूल (महाराष्ट्र), उदय देब (पश्चिम बंगाल), सजिथ कुमार (केरळ), मृत्युंजय (तेलंगणा), कप्तान (मध्य प्रदेश), राज कमल, दिशा चक्रवर्ती, शुभम भट्टाचार्जी, मिका अजीज (पश्चिम बंगाल), नितूपर्ण राजबोंगशी (आसाम), क्रित्यम जैन(मध्य प्रदेश) तर महाराष्ट्रातून घनश्याम देशमुख, भटू बागले, गिरीश सहस्त्रबुद्धे, रवी राणे, उदय मोहिते, सिद्धांत जुमडे, गौरव सर्जेराव, अमोल ठाकूर, ओमकार बागवे, कपिल गायकवाड, जयेश दळवी, राधा गावडे, वासुदेव बोंद्रे.

**पुणे :** भारतातील निवडक 25 प्रतिभावंत व्यंगचित्रकारांचे व्यंगचित्र प्रदर्शन दि. 5,6,7 एप्रिल रोजी बालगंधर्व कलादालन पुणे येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आयोजित केले आहे.

या प्रदर्शनामध्ये अंधश्रद्धा, भोंदुगिरी आणि अज्ञानाविरुद्ध रेखाटलेल्या सुमारे 150 व्यंगचित्रांचा समावेश असेल. विवेकवादी विचारांचे महाराष्ट्रातील हे पहिलेच व्यंगचित्र प्रदर्शन असून व्यंगचित्र प्रदर्शनाचे संयोजन मार्मिकचे व्यंगचित्रकार गौरव सर्जेराव करीत आहेत.




या व्यंगचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन शनिवारी 5 एप्रिल रोजी सकाळी 11 वा. सुप्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांचे हस्ते होणार आहे. प्रमुख वक्ते म्हणून लेखक अरविंद जगताप, तर सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार मंजुल हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. तसेच यानिमित्ताने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय व्यंगचित्र स्पर्धेच्या पारितोषिकांचे वितरणही यावेळी करण्यात येईल. सायंकाळी 5 वा. चित्रकार ओमकार बागवे यांचे कॉमिक स्ट्रिप प्रात्यक्षिक होईल.

रविवार दि. 6 एप्रिल रोजी सकाळी 11 वा. मार्मिकचे व्यंगचित्रकार गौरव सर्जेराव यांचे व्यंगचित्र प्रात्यक्षिक होणार असून सायं. 5 वा. व्यंगचित्रकार घनश्याम देशमुख हे 'बोलक्या रेषा' हे व्यंगचित्रांचे प्रात्यक्षिके सादर करतील. सोमवार दि. 7 एप्रिल रोजी सकाळी 11 वा. जयेश दळवी हे ॲनिमेशनची दुनिया हे प्रात्यक्षिक दाखवणार असून त्यानंतर सायंकाळी 6 वाजता व्यंगचित्र प्रदर्शनाचा समारोप होईल.

वरील तीनही दिवस अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते भारत विठ्ठलदास हे भोंदूबुवा करीत असले तथाकथीत विविध चमत्कारांची प्रात्यक्षिके सादर करतील.

तिन्ही दिवस असणाऱ्या या व्यंगचित्र प्रदर्शनास आणि त्यानिमित्ताने ठेवलेल्या कार्यक्रमांस रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते मुक्ता दाभोलकर, हमीद दाभोलकर, दीपक गिरमे, मिलिंद देशमुख, राहुल थोरात, गणेश चिंचोले, अरविंद, राजीव देशपांडे, श्रीपाल ललवाणी व अनिल वेल्हाळ यांनी केले आहे.

बहुजन सौरभ

वाचकांना आवाहन
आम्ही वाचतो, तुम्हीपण वाचा!



११ एप्रिल राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले, १४ एप्रिल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व ५ एप्रिल सम्राट अशोक यांच्या संयुक्त जयंतीप्रित्यर्थ

आपल्या शुभेच्छा व जाहिराती खालील पत्यावर पाठवाव्यात.

जाहिरात दरपत्रक

| | | |
|---|---|---|
| पान एक | - पूर्ण पान | - ६० हजार रूपये |
| सप्तरंगीन | - अर्ध पान | - ३० हजार रूपये |
| | - पाव पान | - १५ हजार रूपये |
| अंतिम पान | - पूर्ण पान | - ५० हजार रूपये |
| सप्तरंगीन | - अर्ध पान | - २५ हजार रूपये |

शुभेच्छा जाहिरात २००० रु. पासून

:: दैनिक बहुजन सौरभ कार्यालय ::
१/२, स्वराज कॉलनी, अजनी पोलिस स्टेशनजवळ, वंजारीनगर, पाण्याच्या टाकीजवळ, मेडिकल कॉलेज मागे, तुकडोजी महाराज पुतळा मार्ग, नागपूर-४४००२४
मेल -bahujansaurabh@gmail.com
संपर्क - 7020149291, 9422860648, 9421588901

## शुरयोद्धा गोविंद गोपाळ गायकवाड यांच्या समाधी स्थळाचा विकास आराखड्यात समावेश करण्याचे विधानसभा उपाध्यक्षाचे निर्देश

**कोरेगाव भीमा :** छत्रपती संभाजी महाराज यांचा अंत्यविधी करणारे शूरयोद्धा गोविंद गणपत गायकवाड यांचे वढु बुदरुक ता शिरूर जिल्हा पुणे येथील समाधीस्थळ उपेक्षित असून या समाधीस्थळी भव्य स्मारक उभारण्यात यावे अशी आंबेडकरी समाजाची गेल्या अनेक वर्षापासूनची मागणी असुन छत्रपती संभाजी महाराज यांचे समाधी स्थळ तुळापूर, वढु बुदरुक येथे महाराष्ट्र शासनाच्या वतीने संभाजी महाराज समाधी स्थळासाठी 302 कोटी रुपयांचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला असून या विकास आराखड्याचे काम सुरू आहे. या विकास आराखड्यात शूर योद्धा गोविंद गोपाळ गायकवाड यांच्या समाधी स्थळाचा समाविष्ट करण्यात यावा असे निर्देश विधानसभेचे उपाध्यक्ष आमदार अण्णा बनसोडे यांनी प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले आहेत.

विधानसभेच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर आमदार अण्णा बनसोडे यांनी दिनांक 31 मार्च रोजी छत्रपती संभाजी महाराज यांचे समाधी स्थळ असलेल्या तुळापूर, वढु बुदरुक येथील समाधीस्थळी विनम्र अभिवादन केले. यावेळी त्यांचा तुळापूरच्या सरपंच ॲड. गुंपा इंगळे, वढुचे सरपंच ज्ञानेश्वर भंडारे यांनी सन्मान केला. तसेच त्यांनी शुरयोद्धा गोविंद गोपाळ गायकवाड यांच्या समाधीस्थळी भेट देऊन विनम्र अभिवादन केले.



1 जानेवारी शौर्यदीनी भीमा कोरेगाव विजयस्तंभास मानवंदना देण्यासाठी देशभरातून लाखो भीम अनुयायी येत असतात ते अनुयायी वढु बुदरुक येथील छत्रपती संभाजी राजे तसेच शुरयोद्धा गोविंद गोपाळ गायकवाड यांच्या समाधीस्थळी अभिवादन करतात. शौर्यदीनी गोविंद गोपाळ गायकवाड यांच्या समाधीस्थळी महाराष्ट्र शासनाच्या वतीने फुलाची सजावट करुन अभिवादनचे नियोजन करण्यात येते. तसेच अनुयायांना पिण्याचे पाणी, शौचालयाची व्यवस्था, पार्किंगची सोय, आरोग्य सेवा आदी उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती रामदास लोखंडे यांनी दिली.

गोविंद गोपाळ गायकवाड यांची समाधी उपेक्षित असून समाधी स्थळाचा विकास करण्यात यावा अशी मागणी आंबेडकरी समाजाची असुन छत्रपती संभाजी महाराज समाधी स्थळ विकास आराखड्यात गोविंद गोपाळ गायकवाड यांच्या समाधी स्थळाचा समावेश करण्याचे निर्देश विधानसभेच्या उपाध्यक्षांनी प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले. सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांच्याशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच त्यांनी विकास आराखडा बार्टीने तयार करून शासनास सादर करावा असे निर्देश दिले. पांडुरंग गायकवाड यांच्या निवासस्थानी त्यांनी भेट देऊन गायकवाड कुटुंबियांची विचारपूस केली. गायकवाड कुटुंबीयांच्या वतीने उपाध्यक्षपदी अण्णा बनसोडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पांडुरंग गायकवाड, कोरेगाव भीमाचे सरपंच संदिप ढेंरगे, माजी सरपंच विजय गव्हाणे, राजाभाऊ गवदे, रामदास लोखंडे यांच्यासह वढु व कोरेगाव भीमा ग्रामस्थ तसेच आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित होते.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648